# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३१/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. सदाशिव धोंडिराम लाटे,<br>मु.पो. उंब्रज,<br>ता. कराड, जि. सातारा. | अपेलंट |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सातारा.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु विभाग, ओगलेवाडी, ता.कराड, जि. सातारा.<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उंब्रज उपविभाग, उंब्रज,<br>ता.कराड, जि. सातारा.<br>४) कनिष्ठ अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु शाखा उंब्रज, ता.कराड,जि.सातारा.<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :- १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) श्री. बी.डी. नाईकवाडी, सदस्य-सचिव

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. सदाशिव धोंडिराम लाटे, रा. उंब्रज, तालुका-कराड यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सातारा येथे विहित नमुन्यांत अर्ज करून नवीन वीज कनेक्शन मिळण्याबाबत तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. १३-७-२००७ रोजी दिलेला निर्णय मान्य न झाल्यांने त्यांनी दि. २१-७-२००७ रोजी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

अपीलदाराची प्रमुख तक्रार अशी की त्यांनी उंब्रज येथील मिळकत क्र. ५७८ मध्ये जुन्या इमारतीलगत बांधलेल्या नवीन इमारतीमध्ये वीज कनेक्शन मिळण्यासाठी दि. ९–४–२००७ रोजी वि.प. कडे अर्ज दाखल केला होता. तथापि अनावश्यक सबबी सांगून वि.प. ने हेतु:पुरस्सर त्यांना अद्यापही वीज कनेक्शन दिलेले नाही ते त्वरित मिळावे

प्रकरणी सुनावणीची तारीख दि. १७–८–२००७ रोजी सातारा येथे नेमली होती. सदरचे दिवशी कोल्हापूरहून सातारा येथे जातांना अपीलदाराचे विनंतीवरून उंब्रज येथील मिळकत क्र. ५७८ या जागेस ग्राहकासह मंचाचे अध्यक्ष, सदस्य, सदस्य–सचिव तसेच उंब्रजचे सहाय्यक अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी भेट देऊन नवीन कनेक्शन मागणी केलेल्या ठिकाणाची पहाणी केली.

सुनावणीचेवेळी स्वत: तक्रारदार तसेच त्यांचे प्रतिनिधी डॉ. विक्रांत लाटे उपस्थित होते. वि.प. यांचे वतीने श्री घारगे, कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफीसर, मंडल कार्यालय, सातारा, श्री. भगत, कार्यकारी अभियंता, विभाग कराड, श्री. कुंभार, सहाय्यक अभियंता, उपविभाग उंब्रज व श्री. भुतकर, कनिष्ठ अभियंता शाखा कार्यालय उंब्रज हे उपस्थित होते. सदरचे वेळी ग्राहकाचे प्रतिनिधी डॉ. विक्रांत लाटे यांनी असे सांगितले की त्यांनी उंब्रज येथील मिळकत क्र. ५७८ मध्ये बांधलेल्या नवीन इमारतीमध्ये रहिवासी व व्यापारी उपयोगासाठी नवीन वीज कनेक्शन मिळण्याबाबत दि. ९–४–२००७ रोजी वि.प. कडे अर्ज सादर केला होता. त्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रही सोबत जोडले होते. तथापि वि.प. यांनी अनावश्यक कागदपत्रांची मागणी करून व असुरक्षित अंतराचे कारण पुढे करून त्यांना अद्यापही नवीन कनेक्शन दिलेले नाही. त्यामुळे त्यांना निष्कारण शारिरीक, मानसिक तसेच आर्थिक त्रास झाला आहे. त्यांनी पुढे असे सांगितले की नवीन वीज कनेक्शनचे कामी वि.प. यांनी ग्रामपंचायतीचा "ना हरकत" दाखला मागितला आहे तो अनावश्यक आहे. तसेच भारतीय विद्युत अधिनियम १९५६ मधील तरतूदीनुसार सुरक्षित अंतर नक्की किती ठेवावयास पाहिजे याबाबत त्यांना वि.प. ने कधीही माहिती दिलेली नाही अगर सांगितलेली नाही. त्यांचे म्हणणे असे की सातारा–कोल्हापूर या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचेवेळी लाईन शिफ्ट करतांना संबंधित जुन्या ग्राहकाचे वीज कनेक्शन तात्पुरते खंडीत (T.D.) केले व लाईन शिफ्टींगचे काम पूर्ण झाल्यानंतर सुरक्षित अंतराची अट पुढे न करतां सर्वांना फेर कनेक्शन्स देण्यांत आली. त्यावेळी त्यांच्याही नवीन इमारतीला लागून असलेल्या जुन्या इमारतीस फेर कनेक्शन देण्यांत आले. सदरच्या जुन्या इमारतीपासून लाईनचे अंतर हे नवीन इमारतीच्या लाईनपासूनचे अंतरापेक्षा किती तरी कमी आहे आणि तरीही त्या इमारतीस फेर कनेक्शन दिलेले आहे. तरी आम्हास नवीन वीज कनेक्शन विनाविलंब मिळावे असे त्यांनी शेवटी सांगितले.

वि.प. यांचे वतीने श्री. भुतकर, कनिष्ठ अभियंता शाखा कार्यालय उंब्रज यांनी असे सांगितले की अपीलदार यांनी नवीन इमारतीचे बांधकाम सुरू केल्यापासून त्यांना सदरचे बांधकाम हे भारतीय विद्युत अधिनियम १९५६ चे तरतूदीनुसार मंडळाच्या लघुदाब / उच्चदाब वाहिनीपासून विहित अंतरापेक्षा कमी असल्याने भविष्यात अपघात होण्याची तसेच जिवीत हानी होण्याची शक्यता आहे. सबब आपण सध्याचे बांधकाम ताबडतोब थांबवून ते सुरक्षित अंतर ठेवून करावे असे वेळोवेळी तोंडी सांगितले आहे, तसेच लेखीही कळविले आहे.

तथापि त्याकडे अपीलदार यांनी दुर्लक्ष करून विद्युत वाहिनी व बांधकाम यामध्ये सुरक्षित अंतर न ठेवता नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण केले आहे. सदरच्या बेकायदेशीर बांधकामाबाबत उंब्रज ग्रामस्थांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ कार्यालय, कोल्हापूर येथे तक्रार केली होती. तसेच या अनधिकृत बांधकामाबाबत ग्रामपंचायत उंब्रजनेही तक्रार केली आहे. दि. ११ मे २००७ रोजी श्री. लाटे यांनी कार्यकारी दंडाधिकारी, कराड यांचेसमोर केलेल्या प्रतिज्ञापत्राबाबत श्री. भुतकर यांनी असे सांगितले की जरी श्री. लाटे यांनी लघुदाब व उच्चदाब वाहिनीमुळे जिवीत व वित्तहानी झाल्यास मी स्वत: त्यास जबाबदार राहिन असे लिहून दिले असले तरी महावितरण कंपनी कायदेशीर जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. ग्राहकाने बेकायदेशीर केलेल्या बांधकामास ग्रामपंचायतीची हरकत असल्याने वीज कनेक्शनचेकामी वीज कंपनीने ग्रामपंचायतीचा "ना हरकत" दाखला मागितला आहे. त्याबाबत मंचाने विचारणा केली असता "ना हरकत" दाखला वीज कनेक्शनच्याकामी आवश्यक असल्याची तरतूद श्री. भुतकर तसेच अन्य उपस्थित

वि.प. यांना दाखविता आली नाही. सुरक्षित अंतराबाबत श्री. भुतकर यांनी असे सांगितले की भारतीय विद्युत अधिनियम १९५६ मधील तरतूदीनुसार बांधकाम व लघुदाब / उच्चदाब वाहिनीमध्ये किमान अंतर १.२ मीटर (चार फुट) असणे गरजेचे आहे. मात्र ग्राहकाने केलेले बांधकाम व लघु / उच्च दाब वाहिनीचे दक्षिण–पूर्व बाजूचे अंतर ३ ते ३.१/४ फुट येते. सातारा–कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचेवेळी लघुदाब / उच्चदाब वाहिनी स्थलांतरीत (Shift) करताना बाधीत ग्राहकाचे वीज कनेक्शन तात्पुरते खंडित (T.D.) केले होते. सदरची वाहिनी स्थलांतरित केल्यानंतर सर्वांना फेर कनेक्शन दिले आहे. त्यावेळी सुरक्षित अंतराचा निकष (Criteria) लावला होता काय याबाबत मंचाने विचारणा केली असतां श्री भुतकर, कनिष्ठ अभियंता तसेच श्री. कुंभार, सहाय्यक अभियंता उंब्रज यांनी तसा निकष लावला नसल्याचे स्पष्टपणे कबूल केले. अपीलदार श्री. लाटे यांचे जुने इमारतीस फेर कनेक्शन देतांना सुरक्षित अंतराचा निकष लावला नव्हता असे उभयतांनी सांगितले. पुढे त्यांनी असेही सांगितले की ग्राहकाची जुनी इमारत व लघुदाब / उच्चदाब वाहिनी मधील अंतर नवीन इमारतीच्या सुरक्षित अंतरापेक्षा कमी आहे. श्री. भगत, कार्यकारी अभियंता, संवसु विभाग, कराड यांनी असे सांगितले की प्रकरणी तक्रारदारास वेळोवेळी सांगूनही त्यांनी नवीन इमारतीचे बेकायदेशीर बांधकाम केले, त्यांना इमारतीचा मंजूर नकाशा –ज्यावर सरपंच ग्रामपंचायत उंब्रज व ग्रामविस्तार अधिकारी यांची सही व शिक्का आहे– हजर केलेला नाही. तसेच त्यांनी नवीन इमारतीचा दक्षिण–पूर्व कोपरा व म.रा.विद्युत वितरण कंपनीच्या ११ के.व्ही. मसूर उच्चदाब वाहिनीचा विद्युत प्रवाहित भाग (Live Part) यामधील Horizontal सुरक्षित अंतर नियमाप्रमाणे ठेवलेले नाही. ही वस्तुस्थिती सांगून श्री. भगत, कार्यकारी अभियंता, संवसु विभाग, कराड यांनी ग्राहकाची नवीन इमारत व लघुदाब / उच्चदाब वाहिनीमध्ये सुरक्षित अंतर ठेवण्याचे दृष्टीने असे प्रस्तावित केले की ११ के.व्ही.चे कंडक्टरवर उच्चदाबाच्या क्षमतेचे इंसुलेशन कोटींग करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी येणा–या खर्चाचे कोटेशन वि.प. यांनी बनवून येणारा खर्च श्री. लाटे यांनी करण्याचा आहे. त्याची पूर्तता केल्यानंतर ग्राहकास नवीन कनेक्शन देण्यात येईल.

सुनावणीचेवेळी अपीलदार तसेच वि.प. यांचेवतीने केलेले कथन व प्रकरणी उपलब्ध असलेली कागदपत्रे पहातां प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते.

श्री. सदाशिव लाटे यांनी उंब्रज येथील मिळकत क्र. ५७८ मध्ये जुन्या इमारतीस लागून बांधलेल्या नव्या इमारतीमध्ये रहिवास व व्यापारी वापरासाठी वि.प. यांचेकडे नवीन वीज कनेक्शनची मागणी दि. ९–४–२००७ रोजी केली होती. त्याकामी वि.प. यांनी वेळोवेळी मागणी केल्याप्रमाणे ग्राहकाने पुरावे दाखल केले. वि.प. यांचे सांगण्यावरून त्यांनी प्रतिज्ञापत्रही सादर केले. तथापि नवीन वीज कनेक्शनच्याकामी ग्राहकाने ग्रामपंचायतीचा "ना हरकत" दाखला हजर न केल्याचे कारणावरून तसेच नवीन इमारत व वीज कंपनीची लघुदाब / उच्चदाब वाहिनी यांच्यामध्ये भारतीय विद्युत अधिनियम १९५६ चे तरतुदीनुसार १.२ मीटर (चार फुट) चे अंतर नसल्याने सुरक्षिततेच्या कारणावरून त्यांना अद्यापि वीज कनेक्शन मिळालेले नाही. सुनावणीचेवेळी वि.प.चे वतीने सांगण्यांत आले की श्री. लाटे यांच्या नवीन इमारतीचे बांधकाम बेकायदेशीर असल्याने त्यांना वीज कनेक्शन देऊ नये असे ग्रामपंचायत उंब्रजने कंपनीस कळविले आहे. तसेच लगतचे ग्राहकांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे तक्रार करून श्री. लाटे यांनी केलेल्या बेकायदेशीर बांधकामाची चौकशी करावी असे कळविले होते. वरील प्रमाणे तक्रार केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येते. तथापि ग्रामपंचायतीने दि २२–५–२००६ रोजी मंजुर केलेला बांधकाम परवाना अद्यापि रद्द केलेला नाही. शिवाय अनधिकृत बांधकामाबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यास ग्रामपंचायत उंब्रज तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ केंव्हाही सक्षम आहे. नवीन वीज कनेक्शन देतांना ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला हजर करणे आवश्यक असल्याबाबतची तरतूद वि.प. यांना सुनावणीचेवेळी दाखविता आली नाही. त्याबाबत मंचाने सुनावणीचेवेळी वि.प. यांना विचारणा केली होती. ग्रामपंचायतीचा अधिकार हा बांधकामाला परवानगी देण्यापुरता मर्यादित आहे. एखाद्या ग्राहकास वीज कनेक्शन द्यावे अगर देऊ नये यासाठी ग्रामपंचायतीच्या "ना हरकत" दाखला आवश्यक वाटत नसल्याची मंचाची धारणा आहे. सातारा–कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करतांना वि.प. यांनी प्रकल्पामुळे बाधीत होणा–या ग्राहकाचे वीज कनेक्शन

तात्पुरते खंडित (T.D.) केले होते. मात्र महामार्गाचे रूंदीकरणानुसार लघुदाब / उच्चदाब वाहिनीचे स्थलांतर (Shifting) केल्यानंतर T.D. केलेल्या सर्व बाधीत ग्राहकास फेर कनेक्शन जोडून देण्यांत आले. त्यावेळी सुरक्षित अंतराचा निकष लावला नसल्याचे सर्वश्री कुंभार, भुतकर तसेच अन्य वि.प.नी स्पष्टपणे कबूल केले. श्री. लाटे यांच्या जुन्या इमारतीचे फेर कनेक्शनही त्याप्रमाणे जोडून देण्यांत आले. वास्तवीक पहांता श्री. लाटे यांची जुनी इमारत व लघुदाब / उच्चदाब वाहिनीतील अंतर हे त्याच मिळकतीमध्ये लगत बांधलेल्या नवीन इमारत व लघुदाब/उच्चदाब वाहिनीमध्ये असलेल्या अंतरापेक्षा निर्विवादपणे कमी असल्याचे वि.प. यांनी कबुल केले आहे. तरी सुध्दा सुरक्षित अंतर ठेवण्याबाबत तडजोड करावी अशी मंचाची मुळीच धारणा नाही. त्याचा विचार होऊन श्री. भगत, कार्यकारी अभियंता, संवसु विभाग कराड यांनी मांडलेला प्रस्ताव न्यायीक तसेच ग्राहकाची तक्रार निवारण करण्यास उपयुक्त होईल असे मंचाचे मत आहे. यावरून तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत वितरण परवानेधारकाच्या कृतीचे मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २००५ परिशिष्ट “अ” मधील तरतूदीचा विचार करून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. कार्यकारी अभियंता, संवसु विभाग, कराड यांच्या प्रस्तावानुसार सुरक्षित अंतराबाबत कार्यवाही करून वि.प. यांनी अस्तित्वात असलेल्या जाळ्यातून श्री. लाटे यांना तीन महिन्याचे मुदतीत वीज जोडणी देण्याची आहे.
२. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतूदीनुसार वि.प. यांनी मंचास दि. ३१–१०–२००७ पर्यंत कळविण्याचे आहे.
३. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

( बी. डी. नाईकवाडी )
सदस्य – सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( के. व्ही. पाटील )
अध्यक्ष
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर